|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
KAVAYITRI BAHINABAI CHAUDHARI NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON

# निवेदन

## ३२ वा दीक्षांत समारंभासाठी विलंब शूल्कासह पदवी/पदविका प्रमाणपत्र अर्ज करण्यास मुदतवाढ

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातर्फे माहे डिसेंबर-२०२२ व एप्रिल/मे/जून -२०२३ मध्ये व त्यापुर्वी घेण्यात आलेल्या परीक्षांमध्ये जे विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. तद्वतच ज्या विद्यार्थ्यांना विद्यावाचस्पती (Ph.D.) घोषीत झालेली आहे, अश्या सर्व विद्यार्थ्यांकडून पदवी/पदविका प्रमाणपत्रासाठी विलंब शुल्कासह दि.२०.११.२०२३ पर्यंत Online अर्ज मागविण्यात आलेले होते.

तथापि पवित्र पोर्टल व तत्सम काही संस्थांमध्ये अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रही सादर करणे आवश्यक असल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांनी तसेच काही महाविद्यालयांच्या मा. प्राचार्य/ संचालकांनी विद्यार्थी हिताच्या दृष्टिकोनातून पदवी प्रमाणत्रांसाठी अर्ज करण्याची मुदत वाढवून मिळण्याबाबत विद्यापीठास विनंती केलेली आहे.

त्या अनुषंगाने आपल्या विद्यापीठ परिक्षेत्रातील विद्यार्थ्यांना अधिकाधिक रोजगाराच्या संधी प्राप्त व्हाव्यात, या उददेशाने ३२ व्या दीक्षांत समारंभात प्रदान करण्यात येणाऱ्या पदवी/पदविका प्रमाणपत्रासाठी पात्र विद्यार्थ्यांना विलंब शूल्कासह Online अर्ज करण्यास खालीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे.

**माहे डिसेंबर, २०२२ व एप्रिल/मे/ जून -२०२३ तसेच त्यापूर्वीच्या परीक्षेत उत्तीर्ण विद्यार्थ्यांकरीता तसेच विद्यावाचस्पती (Ph.D.) धारक विद्यार्थ्यांसाठी पदवी/पदविका प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज करण्याकामी सुधारीत कालावधी**

| | |
|---|---|
| विलंब शूल्कासह Online अर्ज भरण्याची मुदत | दि. ०८ डिसेंबर, २०२३ ते २० डिसेंबर, २०२३ |

| | पदवी/पदविका अर्जासोबत भरावयाचे शूल्क खालीलप्रमाणे | |
|---|---|---|
| १. | पदवीप्रमाणपत्र शूल्क (उत्तीर्ण वर्षापासून पाच वर्षाचे आत) | ₹ ५००/- |
| २. | पदवीप्रमाणपत्र शूल्क (उत्तीर्ण वर्षापासून पाचवर्षापेक्षा जास्तीचा कालावधी) | ₹ १३००/- |
| ३. | विलंब शूल्क | ₹ १००/- |

तरी उपरोक्त प्रमाणे ३२ व्या दीक्षांत समारंभासाठी Online अर्ज करावयाच्या विलंब शूल्काच्या कालावधीत करण्यात आलेल्या मुदतवाढीची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी. तसेच विद्यार्थ्यांनी पदवीप्रमाणपत्राचे शूल्क Credit Card/Debit Card/Net Banking द्वारे Online Payment पध्दतीने अदा करावे. तत्पूर्वी Online अर्ज करतांना दिलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करावे. आपल्या अर्जात अपुर्णता अथवा त्रृटी आढळून आल्यास आपला अर्ज रद्द करण्यात येईल व कोणतेही शुल्क परत करण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

३२ व्या दीक्षांत समारंभाबाबतची सर्व माहिती यथावकाश वर्तमानपत्रात तसेच विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेत स्थळावर जाहीर करण्यात येईल.

संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

जा.क्र. कबचौउमवि/पदवी/७ह/ ४९४२/२०२३ दि. ०८/१२/२०२३

- **प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :**

१) मा. प्राचार्य/ संचालक, विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये/ परिसंस्था यांना विनंती की, प्रस्तुत निवेदन / सूचना विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी सूचना फलकावर लावण्याची व्यवस्था करावी.

२) कबचौउमवि अंतर्गत सर्व विभाग प्रमुख (प्रशासकीय विभाग व शैक्षणीक प्रशाळा)